**आय्एल्एस् विधी महाविद्यालयाचे**

**कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र**

**आणि स्विसएड**

आयोजित

# ई-पोस्टर स्पर्धा

आय्एल्एस् विधी महाविद्यालयाचे कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र आणि स्विसएड यांच्या संयुक्त विद्यमाने करोना महामारीच्या काळात, घरबसल्या, आपल्या कलात्मकतेने समाजप्रबोधन करण्याची एक उत्तम संधी आपल्या साठी घेऊन येत आहोत, "ई-पोस्टर" स्पर्धेच्या माध्यमातून.

सद्यस्थिती विचारात घेता या स्पर्धेचे आयोजन ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले आहे जेणे करून महाराष्ट्राच्या विविध भागातले विद्यार्थी या संधीचा लाभ घेऊ शकतील.

**काय आहे "ई-पोस्टर स्पर्धा"?**

आयोजकांनी दिलेल्या ४ विषयांपैकी एका विषयावर स्पर्धकांनी ई- पोस्टर बनवायचे आहे. ई-पोस्टरद्वारे, निवडलेल्या सामाजिक प्रश्नांविषयी जागृती करणे तसेच या समस्यांशी निगडित कायदेशीर अधिकार व अशा प्रकारचा हिंसाचार रोखण्यासाठी चालू असलेले कायदेशीर व सामाजिक प्रयत्न याबद्दल लोकांना सजग व साक्षर बनवण्याचा प्रयत्न स्पर्धकांनी करणे अपेक्षित आहे.

**ई- पोस्टर साठीचे विषय:**

1. कौटुंबिक हिंसाचार
2. बालकांवरील अत्याचार
3. स्त्रियांवरील लैंगिक अत्याचार
4. लिंगभाव असमानता

**पात्रता:**

→ ही स्पर्धा महाराष्ट्र राज्यातील सर्व महाविद्यालयातील कोणत्याही वर्गातील (पदवी / पदव्युत्तर / डिप्लोमा) सर्व विद्यार्थ्यांसाठी खुली आहे.

→ स्पर्धकाकडे महाविद्यालयाचे वैध ओळखपत्र अथवा चालू वर्षाची फी भरल्याची पावती असणे आवश्यक आहे.

→ स्पर्धेसाठी नोंदणी करणे आवश्यक आहे.

→ स्पर्धकाला वैयक्तिक अथवा जास्तीत जास्त २ जणांचा संघ म्हणून स्पर्धेसाठी आपली नोंदणी करू शकतात

**नाव नोंदणी:**

→ नाव नोंदणीसाठी खालील गूगल फॉर्म भरावा.
https://forms.gle/8AVJB8aex8tBpZ2L7

→ नाव नोंदणी १५ सप्टेंबर २०२१ पासून सुरू होत असून, नोंदणीसाठीची अंतिम मुदत २५ सप्टेंबर २०२१ आहे.

**स्पर्धेची नियमावली -**

→ पोस्टर "PDF" फाईलच्या स्वरुपात जमा करणे बंधनकारक आहे.

→ स्पर्धकाने आपण केलेल्या पोस्टरचे वर्णन करणारा एक व्हिडिओ पोस्टर सोबत जमा करणे आवश्यक आहे. हा व्हिडिओ २ मिनिटांपेक्षा जास्त नसावा.

→ पोस्टर आकर्षक, प्रभावी आणि नावीन्यपूर्ण असावे. त्यामध्ये स्लोगन (घोषणा), चारोळ्या, संवाद अश्या कोणत्याही स्वरूपात संक्षिप्त परंतु माहितीपूर्ण लिखित मजकूर समाविष्ट करणे आवश्यक आहे.

→ कोणत्याही प्रकारे वाङ्मयचौर्य (ग्राफिक्स तसेच लेखी मजकूराच्या संदर्भात) आढळल्यास, स्पर्धक अपात्र ठरेल.

→ पोस्टर मराठी भाषेत असणे बंधनकारक आहे.

→ पोस्टरमध्ये आयोजकाचे नाव पुढील प्रमाणे लिहावे:- "आय्एल्एस् विधी महाविद्यालयाचे कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र आणि स्विसएड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली ई -पोस्टर स्पर्धा".

→ पोस्टरमध्ये कोणत्याही व्यक्ती/समूह, लिंग, जात, इत्यादीं विषयी आक्षेपार्ह मजकूर वापरू नये.

→ यापैकी कोणत्याही नियमांचे उल्लंघन झाल्यास स्पर्धक अपात्र ठरेल.

→ ई- पोस्टर आणि व्हिडिओ खालील ई- मेल आयडीवर जमा करावे. - projectvaw@ilslaw.in

→ ई- पोस्टर जमा करण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर २०२१ आहे.

**गुणांकनाचे निकष:**

→ नावीन्य: २० गुण

→ विषयाची व्याप्ती व मांडणी: २० गुण

→ प्रभावीपणा: २० गुण

→ दिलेल्या माहितीची अचूकता: २० गुण

→ कल्पक आणि नावीन्यपूर्ण स्लोगनचा समावेश: १० गुण

→ नीटनेटकेपणा: १० गुण

**पारितोषिके:**

***पहिला क्रमांक: रू. ३०००/-***

***दुसरा क्रमांक: रू. २०००/-***

***तिसरा क्रमांक: रू. १०००/-***

स्पर्धेचा निकाल आयएल्एस् विधी महाविद्यालयाच्या वेबसाईटवर तसेच https://www.violencenomore.in/ या वेबसाईटवर जाहीर करण्यात येईल.